Jagdamba Education Society's
Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

* Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 06/03/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई

रणजित देसाई हे प्रसिद्ध मराठी कादंबरीकार होते. त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी कोल्हापूर या ठिकाणी झाला. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या विशेष प्रसिद्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील 'श्रीमान योगी' आणि थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील 'स्वामी' या कादंबऱ्यांना मराठी साहित्यविश्वात मानाचे स्थान आहे. त्यांना 'स्वामी'कार या नावानेही ओळखले जाते. मराठीत ऐतिहासिक कादंबरी लेखनाची मोठी परंपरा आहे. रणजित देसाई हे या नामावलीतील फार वरचे नाव. छत्रपती शिवाजी महाराजांवरील त्यांची 'श्रीमान योगी' ही मराठीतील एक श्रेष्ठ कादंबरी गणली जाते.

याशिवाय देसाईंची 'पावनखिंड' ही आणखी एक ऐतिहासिक कादंबरी. त्यांची 'राधेय' ही कर्णावरची कादंबरीही लोकप्रिय आहे. ग्रामीण साहित्यातही त्यांचे मोठे योगदान आहे. 'सवाल माझा ऐका', 'रंगल्या रात्री' या गाजलेल्या चित्रपटांच्या कथाही त्यांनीच लिहिल्या. 'बारी', 'माझे गाव', 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'राधेय', 'लक्ष्यवेध', 'समिधा', 'पावन खिंड', 'राजा रविवर्मा', 'अभोगी', 'प्रतीक्षा', 'शेकरा' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'रूप महाल', 'मधुमती', 'जल कालवा', 'गंधाली', 'अलख', 'मोरपंखी सावल्या', 'कातळ', 'बाबुलमोरा', 'संकेत', 'प्रपात', 'मेघा', 'वैशाखी', 'आषाढ' हे कथासंग्रह त्यांनी लिहिले. त्याचप्रमाणे 'कांचनमृग', 'धन अपुरे', 'पंख झाले वैरी', 'स्वरसम्राट तानसेन', 'गरूडझेप', 'रामशास्त्री', 'श्रीमानयोगी', 'स्वामी', 'पांगुळवाडा', 'लोकनायक', 'हे बंध रेशमाचे', 'तुझी वाट वेगळी', 'सावली उन्हाची' इत्यादी नाटकेही त्यांनी लिहिली. त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. १९९० मध्ये त्यांना महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. रणजीत देसाई यांचे ६ मार्च १९९२ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Mar 06, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401